# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## भा.पा.हिवाळे शिक्षण संस्थेचे,

## ग्रामीण विकास अध्यन केंद्र समाजकार्य व संशोधन संस्था अहमदनगर

-शोधनिबंध-

**विद्यार्थिनीचे नाव** :- भोये मंगल चिंतामण

**वर्ग** :- MSW भाग 2

**संशोधन मार्गदर्शक :-** प्रा.प्रदिप जारे

**थीम** :- आरोग्य पुनर्वसन आणि पुनर्स्थापनात्मक

**विषय** :- " कोरोना" काळात शालेय विद्यार्थीसोबत समाजकार्यकर्त्यांचा हस्तक्षेप"

**(संशोधन अभ्यास क्षेत्र :-सटाणा (बागलाण ) ता :- बागलाण जि:-(नाशिक)**

# प्रस्तावना (Introduction)

कोविड १९  या विषाणूमुळे कोरोना या साथीच्या रोगाचा २०२० या वर्षी जगभरात प्रसार झाला. या महासाथीच्या रोगाचा प्रभाव सर्वच क्षेत्रांवर झाला. या महासाथीच्या रोगाचा संपूर्ण मानवजातीवर परिणाम झाला. या संकटाचा सामना करत असताना लाखो लोकांना आपला जीव गमवावा लागला. या विषाणूंचा शिक्षण क्षेत्रावर दूरगामी परिणाम झाला. देशभरात कोरोना चा प्रभाव कमी व्हावा यासाठी  २०२० मध्ये देशभरात संचारबंदी लागू केल्यामुळे शाळा महाविद्यालय विद्यापीठ बंद पडली. या सर्व शैक्षणिक संस्था बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांची शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.  विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने विद्यार्थ्यांना डिजिटल  प्लॅटफॉर्म  द्वारे अध्यापन   करण्यास सुरुवात केली.ग्रामीण व दुर्गम भागातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन नव्हते. काही विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन असून देखील नेटवर्क प्रॉब्लेम असल्याकारणाने विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागले.  हीच परिस्थिती सटाणा  शहरातील विद्यार्थ्यांची दिसून आली. अशा या शिक्षणाच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी व  उपाय योजना करण्यासाठी  संशोधीकेनी शोध निबंध सादर केलेला आहे.

# उद्दिष्टे (Objective)

कोरोना महासाथीच्या काळात विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होते. अशा या वंचित असणाऱ्या घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. हा प्रस्तुत संशोधीकेचा प्रमुख उद्देश होता.






# कार्यपद्धती (Methodology)

संशोधीकेने हस्तक्षेप करताना एकात्मिकपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यात गटकार्य, व्यक्ती सहयोग कार्य या पद्धतीचा वापर केला. त्याचप्रमाणे निरीक्षण, मुलाखत, गटचर्चा, गृहभेट इत्यादी तंत्रांचा वापर करून विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेऊन त्या समस्यांचे निराकरण करण्याचे कार्य केले. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने निरीक्षण, मूल्यांकन, संभाषण, नोंदणी, समन्वय , अध्यापन या विविध कौशल्यांचा वापर केलेला आहे .

# सटाणा शहरातील सद्यस्थितीतील शैक्षणिक  मूल्यांकन

प्रस्तुत शोधनिबंधात  गृहभेट, मुलाखत, सामूहिक चर्चा, केस स्टडी, हे तंत्र वापरून सटाणा शहरातील सद्यस्थितीतील कोरोना महासाथीच्या काळात सटाणा या शहरातील  प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक समस्यांचे अध्ययन केलेले आहे.

कोरोना  या महासाथीचा प्रभाव हा शैक्षणिक परिस्थितीवर मोठ्या प्रमाणात झाला. विद्यार्थ्यांचे पायाभूत असणारे प्राथमिक शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे असते. या काळातच विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया  तयार करण्यात येतो.परंतु कोरोना महासाथीच्या काळात या विद्यार्थ्यांना वाचन व लेखन या शिक्षणाच्या पायाभूत  असणाऱ्या बाबी मिळाल्या नाहीत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात शाळेत जाण्यास मिळाले  नाही त्यामुळे शिक्षणाविषयी असणारी गोडी निर्माण झाली नाही.

# हस्तक्षेप (Intervention)

हा उपक्रम राबवण्यामागचा हा हेतू होता की , ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे अपयश व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान हे संशोधिकेच्या निदर्शनास आले. या अनुषंगाने एक सटाणा नगरपरिषद यांच्या माध्यमातून व जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या समन्वयातून हा उपक्रम राबवण्याचे ठरवले.

# उपक्रम (Activity)




## १)क्रीडा उपक्रम




विद्यार्थ्यांना एकत्रित करून त्यांचा गट तयार करण्यात आला परंतु होऊन दीड वर्ष शाळा बंद असल्या कारणाने मुले शिक्षणामध्ये जास्त रस दाखवत नव्हते. त्यासाठी सर्वात प्रथम त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांचे वेगवेगळे क्रीडा उपक्रम राबवून त्यांच्यामध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली.

## २)आरोग्य शिक्षण

सर्व विद्यार्थ्यांना निसर्गाच्या सहवासात एका झाडाखाली एकत्रित बसून त्यांना शिकवण्यात आले विद्यार्थांना स्वच्छता व परिसर स्वच्छता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.



## ३)अध्यापन कार्य

यात इयत्ता पहिली ते दुसरीच्या विद्यार्थ्यांना अंकांची व मुळाक्षरांची ओळख करून देण्यात आले व त्यांना ते १ ते १० पर्यंतचे अंक काढणे शिकवले. इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयाचे अध्यापन केले. त्यात बेरीज व वजाबाकी शिकवण्यात आली.तसेच इग्रजी विषयातील स्पेलिंग, पाठ करून घेतल्या.रोज शुध्द लेखनवहीत रोजविद्यार्थाकडून लिहून घेऊन तपासून सूचना दिल्या. त्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार शिकवण्यात आले.









## ४) विविध कौशल्य मार्गदर्शन

विद्यार्थांच्या गायन व हस्तकला कौशल्याच्या कलेला प्रोत्साहन दिले. तसेच मागील वर्षी त्यांचा अध्यापनाचा त्याचा आढावा त्यांच्याकडून घेण्यात आला त्याचबरोबर गरजू विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या समन्वयातून शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले अशाप्रकारे संशोधिकेने गणेश नगर समुदायामध्यें हा शालेय उपक्रम राबविला.



# निरीक्षण (Observation)

- विद्यार्थ्यांना गट कार्याच्या माध्यमातून एकत्र करून मागील वर्षी अध्ययनाचा थोडक्यात आढावा संशोधिकेने घेतला. त्यात असे निदर्शनात आले की, विद्यार्थी मागील वर्षात काय अध्ययन केले आहे.याचे विद्यार्थांना विस्मरण झाल्याचे संशोधिकेच्या निदर्शनात आले.
- मागील दीड वर्षे शाळा बंद असल्या कारणाने विद्यार्थी कोणत्या इयत्तेत शिकत आहेत हे त्यांना माहिती नव्हते.हे निदशर्नास आले.
- विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड दिसून आली , पण काही विद्यार्थ्यांचे पालक हे निरक्षर असल्याकारणाने व काही विद्यार्थ्यांचे पालक रोजंदारीच्या कामावर जातात. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे त्यांना फारसे लक्ष देता येत नाही त्यामुळे मुलांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होताना दिसून आले आहे.
- संशोधिकेने हा प्रकल्प राबवून विद्यार्थ्यांसोबत गट कार्याच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले त्यात विद्यार्थ्यांमध्ये काही सकारात्मक बदल दिसून आले. त्यात विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येऊ लागले व इयत्ता पहिली ते दुसरी च्या मुलांना अक्षराची ओळख झाली व विद्यार्थ्यांना अभ्यासाची सवय लागली. काही प्रमाणात विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण झाल्याचे दिसून आले.
-

# शिकण्यास मिळालेल्या बाबी( Learning)

- सटाणा नगर परिषद यांच्या माध्यमातून संशोधीकेला समुदायातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या जाणून घेता आल्या व त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात कशाप्रकारे आणता येईल याविषयी ज्ञान विकसित झाले.
- विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती जाणून घेता आली.
- कोणत्याही अडचणीच्या परिस्थितीमध्ये काम करण्याची क्षमता व संवाद कौशल्य समस्या निवारण कौशल्य , वेळेचे नियोजन व नेतृत्व कौशल्य समजून घेण्याची क्षमता विकसित झाले

# आव्हाने ( Challenges)

- सुरुवातीला संशोधिकेने विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन पालकांना भेट दिली व त्यांच्यासोबत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांवर वर चर्चा करण्यात आली आणि विद्यार्थ्यांचा गट तयार करण्यात आला पण त्यात पालकांनी चांगला प्रतिसाद दिला नाही पण तेच काम संशोधिकेने जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांचे समन्वयातून विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत संपर्क साधला तर त्यात संशोधिकेला चांगला प्रतिसाद व सहकार्य मिळाले.

- विद्यार्थी एकत्र आल्यानंतर भांडण गर्दी गोंधळ करीत होते कारण दीड वर्ष शाळा बंद असल्या कारणाने त्यांची अभ्यासाविषयी असणारी जी गोडी होती ती कमी झाली .त्यामुळे त्यांचं जास्त लक्ष आहे खेळाकडे होते त्यांना त्या परिस्थितीतून बाहेर काढून शिक्षणाच्या प्रवाहात कशाप्रकारे आणता येईल हे आव्हान होते.

# निष्कर्ष (Conclusion)
# (Out Put)

१) क्रिडा उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले

२) इयत्ता पहिली ते दुसरी च्या विद्यार्थ्यांना अक्षरांची ओळख करून दिली व एक ते दहा पर्यंतचे अंक काढणे शिकवले.

३) इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना गणिते शिकवले त्यात त्यांना वजाबाकी बेरीज सोडवण्यास शिकवले त्यांच्याकडून पाढे पाठ करून घेण्यात आली व तसेच त्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार शिकवण्यात आले तसेच त्यांना लेखन व वाचन शिकवले. तसेच ते मागील वर्षी शाळेत काय शिकले. याचा आढावा त्यांच्याकडून घेण्यात आला.

४) विद्यार्थ्यांना परिसर स्वच्छता व वैयक्तिक स्वच्छता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कोरोना विषाणूच्या काळात आपली व आपल्या कुटुंबाची आरोग्यविषयक काळजी घ्यायची याविषयी माहिती देण्यात आली.

# ✔ (Out Come)

१) विद्यार्थ्यांच्या लेखन व  वाचन कौशल्य विकसित झाले.

२) विद्यार्थांना लेखन कौशल्यात शुध्द,सुंदर व वळणदारपणा आला.

३) गणित या विषयातील अंक ओळखण्याचे ज्ञान आले. गणित विषयी भीती कमी होऊन गणित विषयी आवड निर्माण होऊन ते आपला अभ्यास वेळेत पूर्ण करू लागले.

४) विद्यार्थांना परिसर स्वच्छता व वैयक्तिक स्वच्छता याविषयी माहिती झाली

५) विद्यार्थांच्या क्रीडा,गायन व हस्तकला या कलेत  प्रगती झाली.

# धन्यवाद